Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD – NIRF – 28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या (नियमित वेतन अनुदानाखालील तसेच स्वावलंबी तत्वावरील नियमित) कार्यालयीन उपस्थितीबाबत बायोमेट्रिक प्रणाली शासनाच्या पत्रानुसार दि. 21/08/2010 पासून लागू करण्यात आली आहे. या संदर्भात बायोमेट्रिक यंत्रणे अंतर्गत ज्या–ज्या शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियमानुसार होत नसल्याचे आढळून आले आहे. या सर्वांना वेळोवेळी त्याप्रमाणे लिखित स्वरुपात अवगत करण्यात येत आहे.

आता मा. शिक्षण संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे यांच्या कार्यालयाचे दि. 19/08/2016 रोजीचे पत्र व दिनांक 20/08/2016 रोजी आयोजित महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या कुलसचिव, उपकुलसचिव यांच्या बैठकीत दर महिन्याच्या 01 तारखेस सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या बायोमेट्रिक उपस्थितीबाबत, त्याचप्रमाणे कार्यालयीन वेळेत कार्यालयातून जाणाऱ्या शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी तसेच कार्यालयीन वेळेनंतर येणाऱ्या शिक्षक/ प्रशासकीय कर्मचारी यांच्या रजेसह सविस्तर माहिती व कार्यरत कालावधीची माहिती पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.

सबब, येथून पुढे दर महिन्याच्या 01 तारखेस वरील प्रमाणे सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची माहिती शासनास कळविण्यात येणार आहे.

तेंव्हा, विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना आदेशावरुन कळविण्यात येते की, बायोमेट्रिक प्रणालीनुसार कार्यालयीन उपस्थितीबाबत येण्या–जाण्याच्या वेळेचे तंतोतंत पालन करावयाचे असून याबाबत कोणतेही कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित शिक्षक/ प्रशासकीय कर्मचाऱ्याची असेल, याची नोंद घ्यावी.

प्रभारी कुलसचिव

जा.क्र. – आस्थापना/3315
दिनांक – 2 SEP 2016
प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, व समकक्ष अधिकारी.
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
4. स्वीय सहाय्यक – मा. कुलगुरू, कुलसचिव, संचालक–बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी.
5. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर (Intranet) प्रसिध्द करावे.

**टिप :– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**